IMPACT FACTOR 5.473(SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*
ISSN 2455-4375

# भारतीय संविधानातील मानवीय मूलभूत हक्क

**प्रा.डॉ. सतीश रामदासजी महल्ले**
इतिहास विभाग प्रमुख
विद्यासागर कला महाविद्यालय,
खैरी (बिजेवाडा), रामटेक जि.नागपूर
Mob. No. 9923572226
Email - mahalle7a30@gmail.com

---

***सारांश :***

*भारतीय संविधानाचागाभा म्हणजे मानवी मूल्यांचे रक्षण आणि संवर्धन, संविधानातील मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे याद्वारे मानवी मूल्यांचे रक्षण केले जाते. मानवी मूल्य म्हणजे समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या तत्वे आणि विश्वास, प्रामाणिकपणा, सत्य, अहिंसा, शांतता, सहकार्य, प्रेम, आदर ही काही सामान्य मानवी मूल्य आहेत. भारतीय संविधानात या सर्व मुलांचा समावेश आहे. मानवीमूल्ये ही अशी तत्वे आहेत जी मानवी अस्तित्वाचे मूलभूत स्वरूप निश्चित करतात. या मूल्यांमध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव, मानवीप्रतिष्ठा, मानवाधिकार इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. मूलभूत हक्क आणि मानवी मूल्य या दोन्ही गोष्टी भारतीय संविधानात समाविष्ट आहेत. मूलभूत हक्क हे नागरिकांना दिलेल्या कायदेशीर अधिकार आहेत. तर मानवी मूल्ये ही सर्वमानवांसाठी सार्वत्रिक तत्वे आहेत.*

**बीजसंज्ञा :** भारतीय संविधान, सरनामा, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मूलभूत हक्क, मानवी मूल्य, धर्मनिरपेक्ष

---

**प्रस्तावना :**

भारतातील मानवी हक्कांची उत्पत्ती खूप पूर्वी झाली. बौद्ध, जैन धर्माच्या तत्वांवरून ते सहज ओळखता येते. हिंदू धार्मिक ग्रंथ आणि गीता, वेद, अर्थशास्त्र आणि धर्मशास्त्र यासारख्या धार्मिक ग्रंथांमध्येही मानवी हक्कांच्या तरतुदी होत्या. अकबर आणि जहांगीर सारख्या मुस्लिम शासकांनाही हक्क आणि न्यायाबद्दल आदर असल्याबद्दल खूप कौतुक वाटले. सुरुवातीच्या ब्रिटिश काळात, लोकांना अनेक हक्कांचे मोठे उल्लंघन सहन करावे लागले आणि त्यामुळे भारतात आधुनिक मानवी हक्क न्यायशास्त्राचा जन्म झाला.

भारतीय संविधानात मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी अनेक तरतुदी आहेत. भारतीय संविधान मानवी हक्कांना मूलभूत अधिकार म्हणून मान्यता देते आणि प्रत्येक नागरिकाला हे हक्क मिळण्याचा अधिकार आहे. हे हक्क सर्व भारतीय नागरिकांसाठी आहेत, त्यांची जात, धर्म, लिंग किंवा इतर कोणताही भेदभाव नसतो.

भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्कृष्ट संविधानापैकी एक आहे. भारतीय संविधानामध्ये मानवी

मूल्यांचा समावेश करण्यात आला आहे. या मानवी मूल्यांमध्ये अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा, उपासना यांची स्वातंत्र्य व संधीची समानता तसेच राजकीय, आर्थिक व सामाजिक न्याय यांचा समावेश होतो. भारतीय संविधानामध्ये या मानवी मूल्यांचे रक्षण करण्यासाठी मूलभूत अधिकार आणि त्यांचे संरक्षण यांची तरतूद करण्यात आली आहे.

**भारतीय संविधान विकास :**

भारतीय संविधान निर्मितीसाठी सर्वप्रथम १९३४ मध्ये, स्वराज्य पार्टीने भारतासाठी स्वतंत्र संविधान असावे अशी मागणी केली. १९३६ मध्ये, फैजपूर येथील अधिवेशनात राष्ट्रीय काँग्रेसने भारतासाठी स्वतंत्र संविधान निर्मितीची अपेक्षा केली. १९४२ मध्ये, स्ट्रॅफड क्रिप्स योजनेने स्पष्ट केले की भारतीय संघराज्याचे संविधान निर्माण करण्यासाठी घटना समिती बोलावण्यात येईल. १९४६ मध्ये ब्रिटनमध्ये सत्ता बदल झाल्यामुळे मजूर पक्ष सत्तेवर आला. या पक्षाचे पंतप्रधान क्लेमेंट एटली यांनी भारतातील राजकीय पेज प्रसंग सोडवण्यासाठी आपल्या मंत्रिमंडळातील तीन मंत्री पाठवले, ज्याला कॅबिनेट मिशन (त्रिमंत्री योजना) म्हणतात. या योजनेने संविधान निर्मितीला मूर्त स्वरूप दिले. कॅबिनेट मिशन योजनेनुसार, भारतीय संविधान सभेची स्थापना १९४६ मध्ये झाली. सभेत एकूण ३८९ सदस्य होते. त्यापैकी २९२ सदस्य ब्रिटिश प्रांतांमधून (हिंदू २१०, मुस्लीम ७८, शीख ०४) व ०४ सदस्य मुख्य आयुक्तांच्या प्रांतांमधून आणि ९३ सदस्य भारतीय संस्थानिकांचे प्रतिनिधी होते. संविधान सभेच्या सदस्यांची निवड प्रत्यक्षपणे प्रौढ मतदानाच्या आधारे नव्हती, तर अप्रत्यक्षपणे एकल संक्रमणीय मतांच्या पद्धतीने केली गेली. या पद्धतीमुळे प्रमाणशीर प्रतिनिधित्व सुनिश्चित होते. सदस्य १९३५ च्या कायद्यानुसार नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निर्वाचित सदस्यांकडून निवडून दिले गेले. जुलै १९४६ मध्ये ब्रिटिश प्रांतांसाठी निवडणुका घेण्यात आल्या. काँग्रेसने २११ जागा जिंकल्या मुस्लिम लीगने ७३ जागा जिंकल्या आणि उर्वरित १५ जागा इतर पक्ष आणि अपक्षांनी जिंकल्या. संस्थानिकांनी संविधान सभेत भाग न घेतल्याने त्यांच्या ९३ जागा रिक्त राहिल्या. या प्रकारे संविधान सभेत विविध धर्म, जाती आणि जमतींचे प्रतिनिधित्व होते. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी, अँग्लो-इंडियन, भारतीय ख्रिश्चन, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला यांचे प्रतिनिधित्व होते.

घटना समितीची बैठक १९४६ मध्ये दिल्ली येथे सुरू झाली. २४ जानेवारी १९४७ घटना समितीने सरदार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली मूलभूत हक्कांवरील सल्लागार समिती स्थापन करण्यासाठी मतदान केले. डॉ. बी. आर. आंबेडकर, बी. एन. राऊ, के.टी शाह, हरमन सिंग, के. एम. मुंशी आणि काँग्रेस तज्ज्ञ समितीने हक्कांची मसुदा यादी तयार केली. जरी काही सुधारणा प्रस्तावित केल्या गेल्या तरी, त्यात समाविष्ट केलेल्या तत्त्वांवर जवळजवळ कोणतेही मतभेद नव्हते. मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेतील अधिकार जवळजवळ पूर्णपणे भारतीय संविधानात मूलभूत हक्कांमध्ये किंवा राज्य धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांमध्ये समाविष्ट केले गेले होते. मोतीलाल नेहरू समिती अहवाल, १९२८ मध्ये १९ मूलभूत अधिकाराचा समावेश करण्यात आला होता, त्यापैकी दहा मूलभूत हक्कामध्ये तर त्यापैकी तीन मूलभूत कर्तव्यामध्ये समाविष्ट होते.

घटना समितीने संविधानाचा मसुदा तयार केला आणि १९४९ मध्ये तो संसदेने मंजूर केला. त्यानुसार भारतीय संविधान २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. जगातील कोणत्याही देशाचे संविधान निर्माण करताना

त्या देशाचे जे उद्दिष्ट आहेत त्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी घटनेची महत्त्वपूर्ण भूमिका असते. हे उद्दिष्ट सहसा नागरिकांच्या स्वतंत्र, समता आणि बंधुत्वाला आणि त्यांच्या इच्छा आकांक्षा पूर्णत्वाला नेण्यासाठी असतात. भारतीय स्वतंत्र लढ्यातून जन्माला आलेल्या जनतेच्या स्वातंत्र्य, न्याय समानतेच्या आकांक्षांचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत दिसून येते. भारताच्या विविधतेतून एकता निर्माण करण्यासाठी भारतीय संविधानात तरतुदी करण्यात आल्या आहेत.

जगातील कोणत्याही संविधानावर त्या देशाची संस्कृती आणि संत साहित्यातील मानवी मूल्याचा प्रभाव पडलेला दिसून येतो. भारतात गौतम बुद्ध, गुरुगोविंद सिंग आणि संत नामदेव यांच्यासारख्या संतांनी समाजाला शांतता प्रेमाने समानतेचा संदेश दिला. या संत साहित्यातून मानवी मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. भारतीय संविधानातही हे मूल्ये अंतर्भूत केल्याचे दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिश राजवटीमुळे भारतीय जनता होरपळून निघाली होती. त्यावेळी भारतीय नागरिकांना कोणत्याही मानवी हक्काची हमी नव्हती. चंद्रशेखर आजाद, भगतसिंग, राजगुरू यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती दिली. या तरुणांमधूनही मानवी मूल्यांचा पुरस्कार दिसून येतो. भारतीय संविधानाचा गाभा म्हणजे मानवी मूल्याचे रक्षण आणि संवर्धन. संविधानातील मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे याद्वारे मानवी मूल्याचे रक्षण केले जाते.

मानवी मूल्य म्हणजे समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या तत्वे आणि विश्वास. प्रामाणिकपणा, सत्य, अहिंसा, शांतता, सहकार्य, प्रेम आणि आदर ही काही सामान्य मानवी मूल्ये आहेत. भारतीय संविधानात या सर्व मूल्यांचा समावेश आहे. डॉ. राधाकमल मुखर्जी यांच्या मते, "मूल्य म्हणजे समाजात मानवता प्राप्त इच्छा आणि उद्दिष्टे." मूल्यांचे अंतरीकरण हे शिकणे किंवा समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, मूल्य म्हणजे अशा कसोटी ज्याद्वारे समूह किंवा समाज व्यक्ती, उद्दिष्टे आणि इतर सामाजिक-सांस्कृतिक वस्तूंच्या महत्वाचे निर्णय घेतात. मानवी मूल्य म्हणजे ज्या गोष्टींना सामाजिक- सांस्कृतिक मान्यता असते आणि त्याचबरोबर त्याला नैतिक अधिष्ठान असते. भारतीय संविधानात या सर्व मूल्यांचा समावेश आहे.

व्हॉल्टेर म्हणतात "समोरच्याचे मत माझ्या विरोधात असले तरी त्याचे मत मांडण्याचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे अशा प्रकारचे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे सर्वोच्च मूल्य शासन व्यवस्थेकडून जोपासले पाहिजे हे श्रेष्ठ दर्जाच्या लोकशाहीचे लक्षण आहे."

सध्या मात्र भारतीय राजकारणात शासनाच्या धोरणाचा विरोध म्हणजे राजद्रोह मानला जातो. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचे धोरण चालू आहे. भारतीय संविधानातील सरनाम्यात आपणास अभिव्यक्ती स्वातंत्र्यांबरोबर मानवी मूल्य देखील दिसून येतात. सरनाम्याला संविधानिक भाग मानला जात नसला तरी सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती खटल्यात सरनाम्याला संविधानाचा भाग असल्याचे स्पष्ट केले आहे.

**भारतीय संविधानाचा सरनामा आणि मानवी मूल्य :**

भारतीय राज्यघटनेत पूर्णतः मानवी मूल्य व्यक्त होतात. घटनांच्या सरनाम्यात मूलभूत तत्वे आणि घटनांच्या पायाभूत तत्त्वज्ञानाची अनुभूती दिसून येते. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा थोडक्यात परिचय करून देणे हे

सरनाम्याचे उद्दिष्ट असते. ती सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि भारताची एकता आणि एकात्मता ही सरनाम्यातील मानवी मूल्य आपणास पाहता येतील.

सार्वभौम असणे म्हणजे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य आणि सर्वोच्च सत्ता असणे होय. याचाच अर्थ भारतीय शासन व्यवस्था येथील जनता ही अंतर्गत दृष्ट्या शक्तिशाली आणि बाह्य नियंत्रक मुक्त आहे. भारताने धर्मनिरपेक्ष लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली यात उदात्त मानवी मूल्य जोपासणारी शासन व्यवस्था भारतीय राज्यघटनेने निर्माण केली. आंतरराष्ट्रीय राजकारणात यामुळे आपली एक वेगळी ओळख निर्माण झाली. संविधानात सार्वभौमत्व कोणापाशी आहे याचा स्पष्ट उल्लेख नसला तरी भारतीय संविधानातील सरनाम्यातील पहिले वाक्य हे जनतेचे सार्वभौमत्व मान्य करणारे व या अर्थानेच जनता हीच शासन संस्था निर्माण करते देशाचा कारभार जनतेतून निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत चालत असतो. सत्ता परिवर्तन हे देखील भारतीय जनताच ठरवते. यामुळे येथील जनता ही सार्वभौम आहे. समाजवादी व्यवस्था निर्माण करून सामाजिक व आर्थिक विषमतेला छेद देण्याचे काम केले आहे. खरे तर धर्मावर आधारित राष्ट्र हे मानवी मूल्याची तत्वे स्वीकारू शकत नाही. भारतीय संविधानाने कोणत्याही धर्माला राजश्रय न दिल्यामुळे भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. याच बरोबर लोकशाही, गणराज्य असे येथील कार्यकारी प्रमुख, राष्ट्रप्रमुख प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पद्धतीने लोकांन मार्फत निवडून दिले जातात. संविधानिक सरनाम्यात आणखी एक गोष्ट नमूद केली ती म्हणजे स्वातंत्र्य आणि न्याय या बाबी मानवी मूल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. बंधुभाव अशा सारख्या मानवी मूल्य जोपासणाऱ्या या सर्व बाबींचा समावेश संविधानिक सरनाम्यात दिसून येतात.

**१) न्याय :**

न्याय ही एक मूलभूत मानवी गरज आहे. न्याय प्रस्थापित केल्याने समाजातील सर्व घटकांना समान संधी आणि संसाधने उपलब्ध होतात. यामुळे सर्वांचे कल्याण होण्यास मदत होते. सर्वांना आपल्या प्रगतीची संधी मिळून देणे म्हणजे न्याय होय. सर्व लोकांचे कल्याण होईल या दृष्टीने उपाययोजना करणे म्हणजे न्याय प्रस्थापित करणे होय. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकांमध्ये न्यायाचे तीन प्रकार सांगितले आहेत

**सामाजिक न्याय :**

सामाजिक न्यायामुळे समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळतात. यामुळे समाजातील विषमता कमी होते आणि सर्वांचे कल्याण होण्यास मदत होते. सामाजिक न्यायामुळे समाजात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण होते. जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश, जन्मस्थान, अथवा लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव करू नये सर्वांचा दर्जा माणूस म्हणून सारखाच असतो.

**आर्थिक न्याय :**

आर्थिक न्याय म्हणजे प्रत्येकाला आपले आणि कुटुंबाचे पालन पोषण करण्याचा हक्क असावा. गरीबी दूर करण्यासाठी प्रत्येकाला समान संधी आणि संसाधने उपलब्ध करून दिले पाहिजेत. आर्थिक न्यायामुळे

प्रत्येकाला आपले आणि कुटुंबाचे पालनपोषण करण्याची संधी मिळते. यामुळे समाजातील गरिबी कमी होते आणि सर्वांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. आर्थिक न्यायामुळे समाजातील आर्थिक विषमता कमी होते.

**राजकीय न्याय :**

राजकीय न्याय म्हणजे राजकीय कारभारात भाग घेण्याचा सर्वांना समान हक्क असावा. प्रौढ मतदान पद्धतीमुळे सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे. राजकीय न्यायामुळे सर्व नागरिकांना राज्यकारभारात भाग घेण्याची संधी मिळते. यामुळे समाजातील लोकशाही मूल्ये मजबूत होतात आणि सर्वांचे प्रतिनिधित्व होते. राजकीय न्यायामुळे समाजातील राजकीय विषमता कमी होते.

**२) स्वातंत्र्य :**

भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला स्वातंत्र्य दिले आहे. हे स्वातंत्र्य व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी आवश्यक आहे. स्वातंत्र्य म्हणजे आपल्यावर कोणतेही जाचक, अयोग्य निर्बंध नसणे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या इच्छेनुसार जगण्याचा अधिकार आहे. विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे भारतीय संविधानातील एक महत्त्वाचे मूलभूत हक्क आहे. या हक्काचा अर्थ असा की, प्रत्येकाला आपले मत आणि विचार मुक्तपणे व्यक्त करण्याचा अधिकार आहे. या हक्काच्या आधारे प्रत्येक व्यक्ती समाजात आपले योगदान देऊ शकते.

श्रद्धा, समजूती आणि उपासनेच्या स्वातंत्र्यातून प्रामुख्याने धार्मिक स्वातंत्र्य व्यक्त होते. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. या हक्काचा अर्थ असा की प्रत्येकाला त्याच्या इच्छेनुसार धर्म आणि पंथ निवडण्याचा अधिकार आहे. स्वातंत्र्य हे एक महत्त्वाचे मानवी मूल्य आहे. स्वातंत्र्यामुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसित होते आणि समाजाची प्रगती होते. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला स्वातंत्र्य दिली आहे, जे मानवी मूल्याचे रक्षण करते.

**३) समता :**

उद्देशिकेने भारतीय नागरिकांना दर्जा आणि संधी याबाबतीत समतेची हमी दिली आहे. समता ही एक महत्त्वाची संकल्पना आहे जी भारतीय संविधान आणि मानवी मूल्यांना जोडते. भारतीय संविधानाच्या कलम १४ मध्ये समानतेची तत्व घोषित केले आहे. या कलमानुसार भारतातील सर्व नागरिकांना समान अधिकार आणि संरक्षण प्राप्त आहे. भेदभाव न करता हा अधिकार जन्म, लिंग, धर्म, जात, वंश, भाषा, प्रदेश किंवा इतर कोणत्याही आधारावर दिलेला नाही. आपल्या विकासाच्या संधी सर्वांना प्राप्त होतील, त्या उपलब्ध करून देताना कोणताही भेदभाव केला जाणार नाही. मानव मूल्यांमध्ये ही समता हा एक महत्त्वाचा घटक आहे. मानवी मूल्ये म्हणजे असे मूल्ये जी सर्व मानवांसाठी समान असतात. या मूल्यांमध्ये न्याय, स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि समानता यांचा समावेश होतो. समता ही मानवी मूल्यांपैकी एक महत्त्वाची संकल्पना आहे. कारण ती सर्व लोकांना समान अधिकार आणि संधी देते.

**४) बंधुता :**

बंधुता ही माया भारतीय संविधानाच्या उद्दिष्ट उद्देशिकेतील एक महत्त्वपूर्ण तत्व आहे. बंधुता म्हणजे भारतीय नागरिकांमध्ये आत्म्यता, सहानभूती आणि परस्पर आदराची भावना असणे. जेव्हा प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा आदर करतो आणि तिच्या स्वातंत्र्य आणि हक्काचा सन्मान करतो तेव्हा बंधुभाव वाढतो. बंधूभावाच्या वाढीमुळे भारतीय समाजात समता आणि न्यायाची स्थापना होण्यास मदत होते.

**मूलभूत हक्क आणि मानवी मूल्य :**

भारतीय संविधानात मूलभूत हक्क हे संविधानाचा भाग ३ मध्ये प्रदान केलेले अधिकार कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय सर्व नागरिकांना समानतेने दिले आहेत. हे अधिकार प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी लागू आहेत.

**भारतीय संविधानातील मूलभूत हक्काची यादी :**

- समानतेचा हक्क (अनुच्छेद १४-१८)
- स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद १९-२२)
- धर्माचा हक्क (अनुच्छेद २६-२८)
- सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (अनुच्छेद २९-३०)
- घटनात्मक उपाययोजनांचा हक्क (अनुच्छेद ३२)

मानव मूल्ये ही अशी तत्वे आहेत जी मानवी अस्तित्वाची मूलभूत स्वरूप निश्चित करतात. या मूल्यांमध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव, मानवी प्रतिष्ठा, मानवाधिकार इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. मूलभूत हक्क आणि मानवी मूल्ये या दोन्ही गोष्टी भारतीय संविधानात समाविष्ट आहेत. मूलभूत हक्क हे नागरिकांना दिलेल्या कायदेशीर अधिकार आहेत. तर मानवी मूल्ये ही सर्व मानवांसाठी सार्वत्रिक तत्वे आहेत. मूलभूत हक्क मानवी मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे साधन आहेत. मूलभूत हक्काच्या माध्यमातून भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला मानवी मूल्याचे अनुसरण करण्याचे अधिकार आणि संरक्षण प्रदान केले आहे. मानवी मूल्यापैकी एक म्हणजे स्वातंत्र्य, मूलभूत हक्कांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, विश्वास स्वातंत्र्य आणि संघटनेचे स्वातंत्र्य यांचा समावेश होतो. हे अधिकार नागरिकांना त्यांच्या स्वातंत्र्याचा वापर करण्याचे अधिकार देतात मूलभूत हक्क आणि मानवी मूल्ये या दोन्ही गोष्टी भारतीय संविधानाच्या केंद्रस्थानी आहेत. या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे भारताला एक लोकशाही आणि समतामुलक समाज बनवण्यास मदत करतात.

मानवी मूल्य ही एक व्यापक संकल्पना आहे जी मानवी जीवनात महत्त्वाच्या असलेल्या तत्वे, विश्वास आणि मार्गदर्शक तत्वे यांचा संदर्भा देते. मानवी मूल्यांचा उदय समाजाच्या विकासाच्या सुरुवातीच्या काळात झाला आणि ते आजही मानवी समाजाचा एक महत्त्वाचा भाग आहे. भारतीय संविधान हे एक घटनात्मक दस्तऐवज आहे जे भारतीय राज्यव्यवस्था आणि लोकशाही यांना मार्गदर्शकन व मानवी मूल्यांचे रक्षण आणि संवर्धन करण्याचे काम करते. संविधानातील अनेक कलमे मानवी मूल्यांना प्रोत्साहन देतात आणि त्यांचे रक्षण करतात.

**निष्कर्ष :**

१) संविधान हे मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साधन आहे. ते नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार आणि मूल्ये सुनिश्चित करते.

२) मानवी हक्क आणि मूल्यांचे पालन करणे, हे समाजाला अधिक न्याय्य आणि समतोल बनविण्यासाठी आवश्यक आहे.

३) भारतीय संविधानात मानवी मूल्यांना कायद्याचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे.

४) भारतीय संविधानावर भारतीय संस्कृती आणि संत साहित्यांचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

५) भारतीय संविधानात सामाजिक न्याय स्थापन करण्यासाठी आरक्षणाची तरतूद केली आहे.

६) भारतीय संविधानात भारतातील सर्व जाती, धर्म आणि संप्रदाय यातील सर्व स्त्री-पुरुष यांना समान मूलभूत हक्क व अधिकार निर्विवाद पणे दिले आहेत.

७) भारतीय संविधान हे अंतिमतः जात, धर्म, संप्रदाय या पलीकडे जाऊन माणसाच्या प्रतिष्ठेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


- भारतीय शासन आणि राजकारण, प्रा. डी एच मेहत्रे, प्रा. राज शेखर सोलापुरे, अरुणा प्रकाशन, लातूर
- समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत, डॉ. प्रदीप आगलावे, साईनाथ प्रकाशन, नागपूर
- भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर
- मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, प्रा. पी. के. कुळकर्णी, डायमंड पब्लिकेशन, सदाशिव पेठ पुणे
- राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचारवंत, रा. ज. लोटे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर
- भारताचे संविधान, प्रदिप गायकवाड, समता प्रकाशन, दिक्षाभूमी नागपूर
- भारत का राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, अरुण रॉय, राधा पब्लिकेशन, दिल्ली